MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –२१३ | गुरूवार दि.२५ एप्रिल २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -213 | THURSDAY DT. 25 APRIL 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## अवैध वाळू वाहतूक करणारा हायवा महसूल पथकाने पकडला ; चालकाविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी ।** गेवराई

गेवराई तालुक्यातून वाळुचा अवैध उपसा सुरुच आहे. महसूल विभागाच्या पथकाने राक्षसभुवन फाट्यावरून वाळू घेऊन जाणारा हायवा पकडून कारवाई केली आहे. अनधिकृतपणे वाळू घेवून जाणारा हायवासह २५ हजार रुपयांची वाळू जप्त करण्यात आली आहे. मंडळ अधिकारी परमेश्वर सानप यांच्या तक्रारीवरून वाळू माफियावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन येथील गोदावरी नदीच्या पात्रातून स्वतःच्या फायद्यासाठी विनापरवाना बेकायदेशीर रित्या हायवा क्रमांक (एम एच २३ ऐयू ९०९१) मधून पाच ब्रास वाळू ज्याची किंमत जवळपास २५ हजार रुपये आहे. दरम्यान हायवा मध्ये घेऊन जात असताना मंडळ अधिकारी परमेश्वर सानप यांनी याप्रकरणी हायवा चालक विठ्ठल मिसाळ यांच्याविरुद्ध गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला

# महायुतीत जागावाटपावरून अद्याप रस्सीखेच : प्रीतमला नाशिकमध्ये उभी करेन

## भाजप नेत्या पंकजा मुंडे यांचे विधान ; उमेदवारीविषयी संभ्रम

**बीड / प्रतिनिधी**

**मला बीडमधून उमेदवारी मिळाल्यानंतर प्रीतम मुंडेंचे काय असा प्रश्न अनेकांना पडला आहे, पण प्रीतम मुंडे यांची काळजी करू नका, मी तिला नाशिकमधून उभी करेन असे मोठे वक्तव्य पंकजा मुंडे यांनी केले आहे. बीडमध्ये लोकसभेच्या प्रचारासाठी आयोजित सभेमध्ये त्यांनी हे वक्तव्य केले आहे.**

**लोकसभा निवडणूक २०२४ साठी नाशिक मतदारसंघात नेमका कोणत्या पक्षाचा आणि कोणता उमेदवार द्यावा याचा पेच हा महायुतीत अद्यापही कायम आहे. एकीकडे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि शिवसेना (शिंदे गट) हे नाशिकच्या जागेसाठी रस्सीखेच करत असताना (२४ एप्रिल) ला अचानक भाजप नेत्या पंकजा मुंडेंनी नाशिक मतदारसंघाबाबत एक मोठी घोषणा केली आहे.**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीड मतदारसंघाच्या विद्यमान खासदार प्रीतम मुंडे यांचे तिकीट कापून त्यांच्याच भगिनी पंकजा मुंडे यांना उमेदवारी देण्यात आली. त्यापूर्वी अनेकदा पंकजा मुंडे भाजपामध्ये नाराज असून, पक्ष सोडणार असल्याच्या चर्चा होत्या. मात्र, उमेदवारी जाहीर झाल्यानंतर पंकजा मुंडे यांनी प्रचार, बैठका, मेळावे यांवर भर दिला. अशाच एका प्रचारसभेला संबोधित करताना प्रीतम मुंडे यांच्यासंदर्भात पंकजा मुंडे यांनी मोठे विधान केले.



### नाशिकसाठी रस्सीखेच

मागील काही दिवसांपासून नाशिकच्या जागेवरून शिंदे आणि पवार गटात बरीच चर्चा सुरू आहे. मात्र, अद्याप तरी इथे कोणताही तोडगा निघू शकलेला नाही. त्यातच भुजबळ यांनी आपण लढणार नसल्याचं म्हणत त्यांचा दावा मागे घेतला. पण तरीही नाशिकची जागा ही शिंदे गटाला गेली की नाही याबाबत कोणतीही स्पष्टता आली नाही. अशातच आज अचानक पंकजा मुंडेंनी आपण नाशिकमधून प्रीतम मुंडेंना उभे करू अशी जाहीर घोषणाच केली. ज्यामुळे आता नाशिकसह महायुतीतील राजकारण देखील बदलू शकते.



### पंकजा मुंडेंचे नेमके वक्तव्य काय?

पंकजा मुंडे म्हणाल्या की, मला बीडमधून उमेदवारी मिळाल्यानंतर प्रीतम मुंडे यांचे काय होणार, असा प्रश्न अनेकांना पडला आहे.प्रीतम मुंडेंना मी विस्थापित करणार नाही, तिचे कुठेही अडणार नाही, मी तिला नाशिकमधून उभी करेन असे पंकजा मुंडे म्हणाल्या. प्रीतम मुंडेंचे राजकारण हे गोपीनाथ मुंडेंच्या पश्चात झाले आहे, मी तर गोपीनाथ मुंडेंचा हात बनले होते असेही त्या म्हणाल्या. मी प्रीतम मुंडेंसाठी तिकिट मागत होते, पण मलाच तिकिट घ्या असे वारंवार सांगितले गेले. त्याचे कारण आता मला समजले, ही देशाची निवडणूक आहे असे पंकजा मुंडे म्हणाल्या.मी रडून मतदान मागणार नाही, गोपीनाथ मुंडे व्हायची माझी ताकद नाही, मला पंकजा मुंडेच राहू द्या, असेही त्यांनी म्हटले आहे.

## उद्धव ठाकरे साहेबांवर टिका करण्याएवढी सुरेश धसांची लायकी नाही

### शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

**प्रतिनिधी ।** बीड

भाजपाच्या व्यासपीठावरून भाषण करताना आमदार सुरेश धस यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे साहेब यांच्याविरोधात बेताल बडबड केली. ठाकरे साहेबांवर टिका करण्याएवढी सुरेश धस यांची लायकी नाही. देवस्थानच्या जमिनी हडप करणार्या धसांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्या घोटाळ्यातून बाहेर पडण्यासाठी सुरेश धस यांचे प्रयत्न दिसत आहेत असा हल्लाबोल शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी केला.



प्रसिद्धी पत्रकामध्ये जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी म्हटले. स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या विरोधात निवडणूक लढवणारे सुरेश धस निवडणुकीच्या दरम्यान स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्यावर अत्यंत खालच्या पातळीवर जावून टिका करत होते. त्या निवडणुकीत सुरेश धस यांचा पराभव झाला. स्वार्थासाठी पक्ष बदलणार्या सुरेश धस यांना दुसर्यांवर टिका करण्याचा नैतिक अधिकार नाही. चारा छावण्यामध्ये शेण खाणारे सुरेश धस देवस्थानच्या जमिनीच्या घोटाळ्यामध्ये अडकले आहेत. त्यांच्यावर गुन्हे दाखल झाले आहेत. या घोटाळ्यातून बाहेर पडण्यासाठी त्यांचा भाजपाला खूष करण्याचा प्रयत्न आहे. ते ज्या पक्षात असतात त्या पक्षाचे कधीच काम करत नाहीत असा आजपर्यंतचा त्यांचा इतिहास आहे.

### शिवसेना जिल्हाप्रमुखांचा सुरेश धसांवर हल्लाबोल

**स्वार्थासाठी जसे कपडे बदलतो तसे पक्ष बदलणार्या सुरेश धसांना शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे साहेब यांच्या विरोधात टिका करण्याचा नैतिक अधिकार नाही आणि त्यांची लायकीही नाही अशा शब्दात शिवसेनेने सुरेश धसांना फटकारले इथून पुढं आमचें दैवत उद्धव साहेबांवर बेताल वक्तव्य केल्यास सुरेश धसांना जिल्ह्यात फिरू देणारं नाही असा इशारा जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी दिला**

## मराठा तरुणांवर कारवाई निंदनीय

### निवडणूक आयोगाकडे दाद मागणार–बजरंग सोनवणे

**प्रतिनिधी ।** माजलगांव



मराठा चळवळीमध्ये काम करणाऱ्या ज्या एका समूहाच्या तरुणांवर त्यांचे कोणतेही गुन्हेगारीचे रेकॉर्ड नसताना तडीपारची कारवाई केली जाते. हे निंदनीय व चुकीचे असून निवडणुक काळात अशा प्रकारची यापुढे कारवाई करू नये, जी कारवाई केली, ती थांबविली पाहिजे. या संदर्भात निवडणूक आयोगाकडे तक्रार करून दाद मागणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी बाभळगाव घाट (ता. माजलगाव) येथे प्रचारादरम्यान बोलताना दिली.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे मुखाचा नातलग हे प्रचारासाठी माजलगाव तालुक्यात फिरत आहेत. तालुक्यातील बाभळगाव घाट येथे बोलताना बजरंग सोनवणे म्हणाले की, बीड जिल्ह्यातील मराठा समाजाच्या २७ तरुणांवर त्यांनी मराठा आंदोलनात सहभाग घेतला. म्हणून जिल्हा प्रशासनाने तडीपारची कारवाई केली आहे. शासनाने आकस बुद्धीने आणि मराठा समाजाविषयी आकस म्हणून त्यांच्यावर तडीपारची कारवाई केलेली आहे. असा आरोप करीत निवडणुकीत दहशतीचे वातावरण करणे, या गोरगरीब तरुणांच्या घरावर दबाव देणे ही राजनीती तर नाही ना? असा संशय व्यक्त करीत हे कोण करतंय, का करायला लावतंय असे प्रश्न उपस्थित केले. महाराष्ट्रात असे हजारो लोक आहेत, की ज्यांच्यावर अनेक गुन्हे असताना त्यांच्यावर तडीपारची कारवाई होत नाही. आमच्या या तरुणांवर का कारवाई केली जाते. यांच्यावर कोण दबाव टाकतय याची तक्रार निवडणूक आयोगाकडे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे व इंडिया आघाडीचा उमेदवार म्हणून करणार असून दाद मागणार असल्याचे त्यांनी सांगितले. तर कारवाई झालेल्या तरुणांच्या पाठीशी उभा असून प्रसंगी वेळ पडली तर न्यायालयात देखील जाऊ अशी ग्वाही ही बजरंग सोनवणे यांनी दिली.



### तळणेवाडी परिसरात पैठणचा उजवा कालवा फुटल्याने लाखो लिटर पाणी वाया


गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तळणेवाडी परिसरात गुरुवारी पैठणचा उजवा कालवा भागदाड पडुन फुटला आहे. त्यातून लाखो लिटर पाणी वाया गेले आहे. पैठणच्या उजव्या कालव्यातून रोटेशन प्रमाणे पाणी सोडण्यात आलेले होते या पाण्यामुळे कालव्या खालील शेतकऱ्यांच्या पिकांना जीवदान तर जनावरांसह माणसांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काहीशा प्रमाणात मिटला होता. मात्र जलसंपदा विभागामध्ये कर्मचाऱ्यांची कमतरता व आहे ते कर्मचारी अधिकारी लक्ष देत नसल्याने अनेकदा कालवा व वितरिका फुटण्याचा प्रकार घडत आहे. याआधी उजव्या कालव्यावरील वितरिका क्रमांक २६ आणि वितरिका क्रमांक २९ ह्या ओव्हरफ्लो होऊन फुटल्याने शेतकऱ्यांच्या भाजीपाला पिकाचे नुकसान होत हजारो लिटर पाणी वाया गेले होते या घटनेला चार–पाच दिवस लोटताच आज पुन्हा तळणेवाडी परिसरात कालवाच फुटला. यामधून लाखो लिटर पाणी वाया गेले आहे दरम्यान कालवा फुटल्यामुळे गुळज येथील सिआर बंद करून खाली येणारे पाणी बंद करण्यात आले असल्याची माहिती आहे. मात्र घटना घडल्यानंतर उशीरा अधिकारी कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले होते.

## पंकजाताई मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रस्ते ग्रामस्थांसाठी की राजकीय पदाधिकारी पोसण्यासाठी? :- डॉ.गणेश ढवळे

**प्रतिनिधी ।** बीड

तत्कालीन ग्रामविकासमंत्री तथा पालकमंत्री बीड पंकजाताई मुंडे यांनी महायुती सरकारच्या सन २०१४ ते २०१९ कालावधीत १९३३ किलोमीटर लांबीचे रस्ते बांधण्यासाठी साधारण ११८६ कोटी रूपयांच्या प्रशासकीय मान्यता मिळवल्या. मात्र बीड जिल्ह्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था बीड यांच्या मार्फत करण्यात आलेले बहुतांश रस्त्यांची कामे त्यांच्या पक्षाच्या पदाधिकारी अथवा नातेवाईकांच्या नावे असणा–या कन्स्ट्रक्शन कंपनीने ग्रामीण रस्ते विकास संस्थेच्या आधिका–यांशी आर्थिक हितसंबंध जोपासत अंदाज पत्रकाप्रमाणे न करता अत्यंत निकृष्ट दर्जाचे केलेली असुन वर्षभरातच खड्डे पडले असुन आता रस्ता खचल्याने मोठमोठी भगदाडे पडली असुन अपघातांना निमंत्रण ठरत आहेत मात्र कंत्राटदार याकडे दुर्लक्ष करताना दिसत आहेत. त्यामुळे सध्या मतदान मागण्यासाठी येणाऱ्या पंकजाताईंना मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रस्ते ग्रामस्थांसाठी की राजकीय पदाधिकारी पोसण्यासाठी असा जाब विचारणार आहेत.



१३ कोटींच्या पालवण ते लिंबागणेश रस्त्यावर ठिगळे आणि भगदाड

बीड तालुक्यातील बीड पालवण चौक ते लिंबागणेश प्राजिमा ३१ जवळ ते आहेर धानोरा ते वरवटी,भाळवणी,बेलेश्वर चौक ते लिंबागणेश एकुण २७ किलोमीटर लांबीच्या अंदाजे किंमत १२ कोटी ७५ लाख रुपये किंमतीच्या रस्त्याचे काम एम.टी.मस्के कन्स्ट्रक्शन बीड या कंपनी मार्फत अत्यंत निकृष्ट करण्यात आले असुन अंदाजपत्रका प्रमाणे काम करण्यात आलेले नसुन

अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आलेले असल्याने जागोजागी खड्ड्यांची थातुरमातुर डागडुजी केल्यामुळे ठिगळे लावलेली दिसुन येतात

### ग्रामीण भागातील रस्ते ग्रामस्थांसाठी की राजकीय पदाधिकारी पोसण्यासाठी पंकजाताईंना ग्रामस्थ जाब विचारणार

बालाघाटावरील बहुतांश रस्ते पंकजाताई मुंडे यांच्या पक्षाच्या पदाधिकारी व त्यांच्या नातेवाईकांच्या कन्स्ट्रक्शन कंपनीकडून अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असुन पालवण ते लिंबागणेश रस्ता भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांचे थोरले बंधु एम.टी.मस्के कन्स्ट्रक्शन बीड कडुन करण्यात आला असून निवडणुकीत मतदान मागण्यासाठी येणाऱ्या पंकजाताईंना पालवण,आहेर धानोरा,वरवंटी,भाळवणी, पोखरी (घाट),पिंपरनई,बेलेश्वर,सोमनाथवाडी येथील ग्रामस्थ रस्ते ग्रामस्थांसाठी की राजकीय पदाधिकारी पोसण्यासाठी असा जाब विचारणार असल्याची संतप्त भावना बोलावून दाखवली.

### कार्यकारी अभियंता (प्रमंग्रासयो) अर्थपूर्ण दुर्लक्ष

# भगवानगडाची ही संस्कृती आणि हा वारसा आहे !

## जसा भाव तसा देव !

प्रतिनिधी । शिरूर कासार

जेव्हा ऐश्वर्य संपन्न गडाचे महंत ते ही देशविदेशात आणि हायफाय जमान्यात देखील आपली संस्कृती आणि वारसा समर्थपणे सांभाळतो त्यावेळी साहजिकच मस्तक झुकल्या शिवाय राहत नाही .श्रीक्षेत्र भगवान गडाची निर्मिती ही एका संघर्षातून तयार झाली असुन ऐश्वर्यसंपन्न संत भगवान बाबांनी पारमार्थिक ऐश्वर्याबरोबर भौतिक ऐश्वर्याची पताका फडकावली ,ऐश्वर्य संपन्न असुन देखील जसा ज्याचा भाव तसा त्याचा देव या प्रमाणे ते अनुकरण करत होते ,साध्याला साधे तर श्रीमंताबरोबर आपल्या दुहेरी श्रीमंतीचे दर्शन घडवून देत होते ,घोडा तांग्याचा प्रवास देखील हादळापट न होता व्हावा यासाठी तांग्याची चाक ही जिप गाडीचे टायर वापरण्याची संकल्पना ही त्याचे एक साक्ष ठरते ,घोड्याचा तांगा ,पांढरे शुभ्र वस्त्र ,केशरी पालकोलचा फेटा ,कपाळी गोपिचंदन अष्टगंधाचे हे तेजस्वी वैभव होते ,मात्र एव्हडे वैभव असले तरी आपण साधेपणा देखील सोडला नसल्याचे



ते दाखवून देत होते ,राजवैभवात गडाचा हा राजा आपले धर्मकार्याचे रत्नजडीत सिंहासनावरून धर्मध्वजा फडकवत होता .त्यांचे पश्चात द्वितीय महंत संत भिमसिह महाराज यांनी या वैभवात भर घालून गडाची धूरा ,संस्कृती व वारसा चालवण्याचे काम करत गडाचा नावलौकिक दूरवर नेला .भिमसिह बाबांनी देखील ऐश्वर्याबरोबर संस्कृती व परंपरा अबाधीत ठेवली .

आता तर या गडाची संस्कृती व परंपरा सातासमुद्रापार नेण्याचे काम विद्यमान महंत डॉ न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री यांनी ज्ञान विज्ञान सोबतीला घेऊन केले .अवघड तत्वज्ञान सोप्या भाषेत सांगत ग्रंथराज ज्ञानेश्वरी मय जिवन समाजाप्रती समर्पित केले आहे ,गडाच्या वैभवा बरोबर गडाचा साधेपणा त्यांच्याकडून अनुभवास येतो आहे .घोगसपारगांव येथे सध्या संत भगवानबाबांनी प्रारंभ केलेला ९० वा सप्ताह मोठ्या थाटात सुरू आहे या ऐश्वर्य संपन्न सप्ताहात महंत डॉ न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री हे भोजन मंडपात अगदी पंगतीला बसुन साध्या पत्रावळीवर भाजी भाकरीचे जेवन करून संत भगवानबाबांच्या आठवणीला उजाळा देत असल्याचे एक विलोभणीय दर्शन भाविकांनी अनुभवले ,यावेळी सोबत प्रधान आचार्य नारायण स्वामी .

# धनंजय मुंडे यांच्या भाषणातून महत्वाचे !

- लहान बहिणीच्या रॅलीत पंकजाताई रथात तर धनुभाऊ कार्यकर्त्यांसोबत पायी चालत!
- धनंजय मुंडेंच्या तडाखेबंद भाषणाने महायुतीची विजयी संकल्प सभा गाजवली
- प्लॉटिंगशिवाय थोडीही शेती नावावर नसणारा कारखानदार शेतकरी पुत्र कसा - धनंजय मुंडेंचा घणाघात
- बहुरंगी उमेदवाराचे मराठा आरक्षणाच्या लढ्यात मागील २० वर्षात काय योगदान? - मुंडेंचा प्रश्न
- मुंडे घराण्याने मराठा सह विविध समाजाच्या कुटूंबातील नेतृत्व घडवले, आमदार-खासदार केले, तेव्हा कधी कोणाची जात पाहिली नाही!
- धनंजय मुंडेंनी १९५२ पासूनच्या खासदारांची मांडली जातींसह यादी
- स्वतः गुपचूप कुणबीचे आरक्षण घेऊन केज खरेदी विक्री संघ निवडणुकीत लाभ मिळवलेला व्यक्ती इतरांना काय न्याय देणार?
- नगर-बीड-परळी रेल्वे तर धावेलच पण केंद्र व राज्यात एका विचाराचे सरकार राहिल्यास, परळी ते मुंबई वंदे भारत एक्सप्रेस पाच वर्षात धावेल - धनंजय मुंडे
- विधानसभा निवडणुकीचे नियोजन फिक्स, कोणीही काळजी करण्याची गरज नाही - मुंडेंनी महायुतीतील नेत्यांना दिला विश्वास! रमेश आडसकरांनी विधानसभेचा विषय काढला आणि संपूर्ण सभेत पिकला हशा!
- मोदींजींच्या नेतृत्वात विकासाचे अविरत पर्व जिल्ह्यात सुरू राहील, जात-पात सोडून विकासाची क्षमता असलेल्या पंकजताईंना निवडून देण्याचे धनंजय मुंडेंचे आवाहन
- ३ जूनला स्व.गोपीनाथराव मुंडेंची पुण्यतिथी; ४ जूनला जिल्हा पंकजाताईला विजय तिलक लावून गुलाल अर्पण करणार - धनंजय मुंडे
- जिल्ह्यात अधिकचे १२४ टीएमसी पाणी आणण्याचा प्रकल्प प्रस्तावित, ७ लाख हेक्टर क्षेत्र येणार ओलिताखाली; केंद्रीय मंत्र्यांच्या मांदियाळीत उठ-बस असलेला खासदार हवा, जिल्हा सुजलाम-सुफलाम होईल



# संत कृपा,भक्तगण आणि सर्वांच्या कृपाशीर्वादाने श्री रामगड देवस्थानचा विकास

## ह.भ.प.विष्णु महाराज लिंबोडीकर आदर्श पुरस्कारांचे संताच्या हस्ते वितरण

## अखंड हरिनाम सप्ताहातील काल्याचे किर्तनप्रसंगी भक्तांची मांदियाळी

प्रतिनिधी । आष्टी

मी ज्या ठिकाणी गुरे राखले,खेळलो बागडलो त्या ठिकाणी रस्ता नव्हता पिण्यास पाणी नव्हते. जनावरे व माणसांना एकाच विज विहरातील पाणी प्यावे लागत होते.अशा दुर्गम व माळरानावर आपण २०१० साली रामगड देवस्थानची स्थापना केली.एक लिंबाचे मोठे झाड ही या गडाची खूण होती.आज येथे सर्व शेतकऱ्यांच्या सहकार्याने रस्ता झाला.पिण्याच्या पाण्यासाठी हातपंप,कीर्तनमंडप झाला आहे.खासदार,आमदार ,राजकीय नेते, पदाधिकार्यांच्या मदतीने मोठा निधी मिळालेला आहे.दानशुर भक्तांनी व शिष्यगणांनी दिलेल्या देणगीतुन अल्पावधीत श्री श्रेत्र रामगड नावारुपाला आला आहे.अल्पावधीत श्रेत्र रामगड देवस्थानचा संतकृपेने,नेत्यांच्या आणि भाविकांच्या मदतीने विकास झाला असल्याचे प्रतिपादन रामगड देवस्थानचे अध्यक्ष ह.भ.प.विष्णु महाराज लिंबोडीकर यांनी केले.

आष्टी तालुक्यातील लिंबोडी - देविनिमगाव या संत बाळुदेव महाराज यांच्या पावन भुमीत संत मदन महाराज यांच्या कृपाशीर्वादाने,राष्ट्रसंत वामनभाऊ व राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या कृपेने श्री क्षेत्र रामगड येथे सप्ताहातील काल्याचे कीर्तनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आष्टी तहसिल कार्यालयातील पेशकार भगीरथ धारक,राम महाराज,बाबुराव पाटील सुर्यवंशी,जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,राजेंद्र लाड सर,ह.भ.प.हरिदास महाराज चाटे,ह.भ.प.आदिनाथ महाराज गुणारे,ह.भ.प.श्याम महाराज गव्हाणे,ह.भ.प. भरत महाराज आघाव, ह.भ.प.अशोक महाराज काकडे,ह.भ.प.नवनाथ महाराज भारती,ह.भ.प. शिवाजी महाराज फिस्के,ह.भ.प.अशोक महाराज जठार,सचिनबाप्पा गोंदकर, माजी सरपंच समाधान आंधळे,विजय घुगे,कर्डीले,हरिनाना शिंदे,डा.दादा अनारसे,बबन धोंडगे आदि सामाजिक,राजकीय,धार्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. रामगड येथे गाथा पारायण,रामायण व संतचरित्र कथा ज्ञानयज्ञ व अखंड हरिनाम सप्ताह दि.१७ ते २४ एप्रिल २०२४ या कालावधीत संपन्न झाला.या सप्ताहात ह.भ.प.धर्माचार्य आजिनाथ आंधळे महाराज,रामायणाचार्य ह.भ.प.सुदाम महाराज ,ह.भ.प.उमेश महाराज पुरी,ह.भ.प.रामकृष्ण महाराज,



भागवताचार्य ह.भ.प.रोहिदास महाराज,ह.भ.प.ब्रम्हचैतन्य तावरे महाराज,ह.भ.प.संजय महाराज यांचे हरिकीर्तन झाले. आष्टी तालुक्यातील देविनिमगाव -लिंबोडी या परिसरात असलेले रामगड देवस्थान सध्या चर्चेत आले आहे.या देवस्थानचे महंत विष्णु महाराज लिंबोडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली रामकथा व भव्य दिव्य सप्ताह झाला. या सप्ताहातील काल्याचे कीर्तनास हजारो भाविकांच्या उपस्थिती होती.

यावेळी ह.भ.प.विष्णु महाराज लिंबोडीकर यांनी संत तुकाराम महाराज यांच्या अभंगावर निरुपन केले.परमार्थात शुध्द चित्ताला महत्त्व असते.शुध्द चित्त असणाऱ्या माणसात देव रहत असतो.रामगड देवस्थान १५ वर्षापुर्वी दुर्गम व रस्ता नसलेल्या ठिकाणी स्थापन केले होते.साधु संत,महंत राजकीय,सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांच्या सहकार्य व मदतीने हे संस्थान विकसीत होत आहे.जीवन आहे तोपर्यत चांगले वागा.चांगले वागणाऱ्यांना मोक्ष तर वाईट वागणाऱ्यांना नरक प्राप्तीच असते.नामयज्ञ,सप्ताह हे पुण्यासाठी असतात.परमार्थ व संसार वेगळा नाही.दोन्ही क्षेत्रात माणसांना एकत्रीत यावे लागते.परमार्थ करण्यासाठी शुध्द भाव व ओढ लागते.आचार,विचार व तत्त्व या तीन गोष्टी एकत्रीत आले की ते मित्र होत असतात.आई -वडिलांची सेवा,गायीची सेवा आणि देशाची सेवा केली की ती देवाची सेवा होत असते.जन्मदाती माता,गोमाता आणि पृथ्वी माता या तीन माता आहेत.




बीड जिल्हा कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक मा.श्री. नंदकुमार ठाकूर साहेबांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना फहीम इनामदार, रियाज सिद्दीकी, रविंद्र शिनगारे

# मराठा आरक्षण व ओबीसीचे संरक्षण करण्यासाठी बहुजन वंचित आघाडीला निवडून द्या : अशोक हिंगे

प्रतिनिधी । बीड

मराठा आरक्षण व ओबीसीचे संरक्षण करण्यासाठी बहुजन वंचित आघाडीला संसदेत पाठवा आसे आवाहन बीड लोकसभेचे उमेदवार अशोक हिंगे यांनी केले दिंद्रुड परिसरातील गावच्या मतदाराच्या बैठकीत बोलत होते पुढे बोलताना हिंगे पाटील म्हणाले की आज केंद्रातील सरकारची संविधानाकडे वक्रदृष्टी आहे त्यांना संविधानात अमुलाग्र बदल करून हिंदू राष्ट्र बनवण्याच्या दृष्टीने घटना करायची आहे परंतु आम्ही हे कदापिही खपवून घेणार नाही म्हणूनच संविधानाचे संरक्षण, मराठा समाजाचे आरक्षण, आणि ओबीसी समाजाचे संरक्षण करत बिन दलित दुबळे वंचित घटकासाठी वंचित बहुजन आघाडी काम करत राहील केंद्रातील महायुती सरकार जनतेला हक्क न देता ठीक देण्याचे काम करत आहे म्हणून जनतेला जनतेचा हक्क मिळवून देण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचा आवाज संसदेत जाणे आवश्यक आहे ऍड प्रकाश आंबेडकर साहेबांच्या नेतृत्वाखाली काम करून शेतकऱ्याच्या मालाला हमीभाव, तरुणांच्या हाताला काम, व्यापारी वर्गाची जाचक अटीतून मुक्तता, भ्रष्टाचार मुक्त प्रशासन, आधी गोष्टी प्रामुख्याने राबवण्यासाठी काम केले जाईल. तरुणांना बेकारी भत्ता नको नोकरी हवी आहे शेतकऱ्यांना पी एम किसान चे २००० नको शेतमालाला हमीभाव हवा भीक नको हाक्क हवा हा नारा देत वंचित बहुजन आघाडी काम करेल म्हणून सर्व जाती धर्मातील जनतेने गोरगरिबांचा वंचिताचा आवाज संसदेत पाठवावा असे आव्हान अशोक हिंगे पाटील यांनी केले दिंद्रुड येथे.. जनसंवाद व प्रचार बैठक संपन्न झाली यावेळी उमेदवार अशोक हिंगे पाटील, यांच्यासोबत डॉ. नितीन सोनवणे,अनिल डोंगरे, धम्मानंद साळवे, सचिन उजगरे,वीर पुरुषोत्तम, गौतम आगळे, बालाजी जगतकर, डॉ. संजय नागलगावकर,राम उदमले, सिद्धार्थ मांदळे, सचिन देशमाने, बबन डोंगरे ,शामा डोंगरे,राम देशमाने, अमोल देशमाने, बबलू देशमाने, समाधान गायकवाड, गणेश कोल्हे, सुनील वाळकर, अविनाश गवळी,ऋषी उघडे, कपिल उजगरे, अमोल बनसोडे, पवन डोंगरे,अविनाश डोंगरे आदी उपस्थित होते.



# अल्ताफ शेख यांचे हिंदी चित्रपट संगीत दिग्दर्शनात पदार्पण

## संगीत दिलेला पहिला हिंदी चित्रपट लोरी ३ मे रोजी प्रदर्शित होणार

प्रतिनिधी । बीड

**जिल्ह्याचे जावई तथा सोलापूरचे भूमिपुत्र सुप्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक, अभिनेते, गीतकार म्हणून मराठी-हिंदी चित्रपटसृष्टीत यशस्वी वाटचाल करणारे अल्ताफ दादासाहेब शेख यांनी आता संगीत दिग्दर्शनातही पदार्पण केले असून त्यांनी संगीत दिलेला लोरी हा पहिला हिंदी चित्रपट येत्या ३ मे २०२४ रोजी सगळीकडे प्रदर्शित होत आहे. या चित्रपटातील गाणीही त्यांनीच लिहिली आहे. यामुळे बीड जिल्ह्यातील सिनेरसिकांतून आनंद व्यक्त केला जात आहे.**

यापूर्वी अल्ताफ शेख यांनी लिहिलेल्या व २००१८ साली प्रदर्शित झालेल्या वेडा बीएफ या चित्रपटातील हे माझे दुर्वेश बाबा या सुप्रसिद्ध गायक अल्ताफ राजा यांनी गायलेल्या गाण्याची वर्ल्ड बुक रेकॉर्डमध्ये नोंद झाली होती. आता लोरी या चित्रपटात सुद्धा ख्यातनाम गायक सुरेश वाडकर यांच्या आवाजातील ममता की मुरत हे गाणे गाजत आहे. सुरेश वाडकर






यांचा धीर गंभीर आवाज लाभलेले हे गीत अल्ताफ शेख यांनी एवढे सुंदर लिहून संगीतबद्ध केले आहे की, ऐकणारे श्रोते तल्लीन होऊन जात असून लोरी चित्रपट प्रदर्शित होण्याची आतुरतेने वाट पाहत आहेत. लोरी चित्रपटातील सर्व गाणी अल्ताफ शेख यांनीच लिहिली असून त्यांनी लखनौचे सुधीर कुमार हजेरी यांच्यासोबत मिळून लोरी चित्रपटाला संगीत दिले आहे. या चित्रपटातील गाणी सुरेश वाडकर, उर्मिला धनगर, स्वप्निल बांदोडकर, प्रियांका बर्वे आणि अंजली गायकवाड यांनी गायली आहेत. या चित्रपटाचे निर्माता अविनाश कवठणकर आणि दिग्दर्शक राजू रेवणकर, डीओपी कुमार डोंगरे, पणती पटेल, राजकुमार, शान कक्कर, रंजीत दास, अभिलाषा घैरा, प्रतिभा शिंपी, आरती शिंदे, अली शेख आणि अविनाश कवठणकर, ओमसाई राम क्रिएटिव्ह वर्ल्ड निर्माता अविनाश कवठणकर यांची निर्मिती आहे. कला राजू माळी, मेकअप केतन, कॉस्ट्यूम संगीता चौरे, आरती पाटील कुलकर्णी, लाइन प्रोड्यूसर शाहजहांन शेख, प्रोडक्शन मैनेजर अमजद खान-शेख, किरण घोडके, अभिषेक चौरे, हर्ष राजे, मेकअप डिपार्टमेंट किरण सिद्दीद्दी सह हिंदी आणि मराठी चित्रपट सृष्टीतील बरेच कलाकार या चित्रपटाचा भाग आहेत. अशी माहिती अल्ताफ शेख यांनी सोशल मीडिया, फेसबुक, इंस्टाग्रामवर पोस्ट केली आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सामाजिक उपक्रमातून साजरी

**प्रतिनिधी । नाळवंडी**

भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती संपूर्ण जगभर साजरी होते,,१४ एप्रिल ला शहरी भागात तर बाकी एक महिना खेडे गावात,त्या अनुषंगाने जयंती उत्सव समिती नाळवंडी च्या आयोजकांनी एक चांगला उपक्रम हाती घेऊन महामानवाची जयंती साजरा करण्याचे ठरवले,बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती वेगवेगळे उपक्रम राबवून,बाबासाहेब यांची जयंती नाचून नाहीतर वाचून साजरी झाली पाहिजे,बाबासाहेबांची आज खऱ्या अर्थाने जयंती साजरी झाली असे म्हणता येईल,,बाबासाहेबांचे विचार




तळागळात पोहचवण्याचे काम या मंडळाने केले,तसेच

ढेकनमोह या गावी असलेले पसायदान सेवा प्रकल्प या ठिकाणी अनाथ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून, महामानवाची जयंती साजरा केली,शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे,जो प्राशन करेल तो गुर गुरल्या शिवाय राहणार नाही,लेखणी हेच सर्वात मोठे शस्त्र आहे,असे या वेळी यूवा नेते मसु जाधव यांनी म्हंटले.



## सखुबाई गायकवाड यांचे दुखद निधन

आष्टी प्रतिनिधी तालुक्यातील केरुळ येथील सामाजिक कार्यकर्त्या व मुंबई येथे स्थायिक असलेल्या गायकवाड यांची हृदय विकाराच्या झटक्याने नुकतेच निधन झाले तीन मुलं व परिवार आहे

# भाजपा पंचायतराज व ग्रामविकास विभाग तालूकाध्यक्षपदी नरेश पवार याची निवड

भाजपा प्रदेश अध्यक्ष आदरणीय श्री चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब.. भाजपा पंचायत राज ग्रामविकास प्रदेश संयोजक आदरणीय गणेश काका जगताप साहेब.. भाजपा प्रदेश सह संयोजक आदरणीय संतोषजी चौधरी साहेब . भाजपा राष्ट्रीय सचिव लोकनेत्या आदरणीय पंकजाताई साहेब मुंडे.. भाजपा खासदार आदरणीय प्रितमताई साहेब मुंडे..भाजप आमदार आदरणीय लक्ष्मण आण्णां पवार साहेब.. भाजपा बीड जिल्हा अध्यक्ष आदरणीय राजेंद्र जी मस्के साहेब... भाजपा पंचायत राज ग्रामविकास चे बीड जिल्हा अध्यक्ष आदरणीय निलेश जी डहाळे साहेब यांच्या सर्वांच्या आशीर्वादाने माझी भाजपा पंचायत राज ग्रामविकास महाराष्ट्र.बीड तालुका अध्यक्ष पदी निवड झाली तरी मी भाजपा च्या सर्व आदरणीय नेते मंडळी चा आभारी आहे...

आणी आपण सर्वांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास मी सार्थकी नक्की करेल ...व बीड तालुक्यातील प्रत्येक गावातील सर्व सामान्य जनते पर्यंत पंचायत राज ग्रामविकास च्या माध्यमातून शासनाच्या सर्व योजना पोहचविण्यासाठी नक्कीच नम्रपणे कार्य करेल ..व माझी पंचायत राज ग्रामविकास च्या बीड तालुका



अध्यक्ष पदी नियुक्ती केल्याबद्दल मी सर्वाचा आभारी आहे
आपला नरेश पवार

# दिल्ली ची हुकूमशाही हकालन्यासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना प्रचंड मताने निवडून द्या

## सह संपर्कप्रमुख डॉ लक्षराज सानप जिल्हा प्रमुख परमेश्वर सातपुते

**प्रतिनिधी । बीड**

आज दिनांक २४/५/२०२४ रोजी शिरूर तालुका शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तालुका पदाधिकारी यांची बैठक सह संपर्कप्रमुख डॉ लक्षराज सानप, जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते जिल्हा समन्वयक भाई संजय महाद्वार, जिल्हा संघटक रतन गुजर उपजिल्हा प्रमुख अजीनाथ खेडकर, तालुका प्रमुख सोपान मोरे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आली होती

या प्रसंगी बोलताना शिवसेना सह संपर्कप्रमुख डॉ लक्षराज सानप म्हणाले की पक्ष प्रमूख उध्दव ठाकरे साहेब हे मुख्यमंत्री असताना कोरोना सारख्या महामारीत कुटुंब प्रमुख म्हणून काम करून सर्व सामन्याचे जीव वाचवले राज्य प्रगत्ती करत असताना भाजपला पोटदुखी होत होती म्हणून त्यांनी उध्दव साहेबांचे सरकार गद्दार मिंदे सोबत स्थापन केले याचा आता ह्या निवडणुकीत बदला घेण्यासाठी महाविकास आघडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना निवडून आणा

या वेळी मार्गदर्शन करताना शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा प्रमुख परमेश्वर सातपुते म्हणाले की ही लोकसभा निवडणुक देशातील मोदी, शहा, यांची हुकूमशाही गाडून टाकण्याची आहे ४०० पारचा नारा



देणारे मोदी शहा यांच्या पाया खालची वाळू सरकली आहे त्यांच्या १५० पण जागा येणार नाहीत हे लक्षात आल्यावर त्यांची ऐक ऐक जागे साठी मर मर सुरू आहे साम दाम दंड भेद ही नीती वापरून कशाही परिस्थितीत निवडणुक जिंकायची असा अटटाहास सुरू आहे पण देशातील राज्यातील जनता महागाई, बेरोजगारी भाजप च्या खोट्या बोलण्याला त्रस्थ झालेली आहे त्यामुळे जनतेनेच ही निवडणूक हातात घेतली असून त्यांचा पराभव निश्चित आहे बळीराजाला देशोधडीला लावणाऱ्या ह्या सरकार च्या विरोधात मतदान करून महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना प्रचंड मताने निवडून आणा

या बैठकीस राजेश कोकने, शशी सानप, तय्यब पठाण, शेख कलीम, रमाकांत मावस्कर, नामदेव आघाव, संदीप शिंदे, हरिभाऊ मोरे, संजय सानप, भीमा शिंदे, सखाराम सातपुते, बाळासाहेब घुगे, विठल लाटे, शेख लाला इत्यादी तालुक्यातून असंख्य पदाधिकारी, लोकप्रतिनिधी शिवसैनिक उपस्थित होते..!!



**आमचे लाडके जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांचे ज्येष्ठ चिरंजीव आकाश अनिल जगताप यांना वाढदिवसाच्या कोटी कोटी शुभेच्छा शुभेच्छुक शिवसेना नगर रोड विभाग बीड**

# जामखेड शहरातील संताजीनगर भागातील एका ६० वर्षे वयाच्या वृध्दाचा मृतदेह

**प्रतिनिधी । जामखेड**

शहरातील अमरधाम परीसरातील विटभट्टी जवळ आढळून आला. सदरचे वृध्द इसम हे गेल्या चार पाच दिवसांपासून आपल्या घरातुन बेपत्ता होते.अंबादास रामभाऊ काळे, वय ६० वर्षे रा. संताजीनगर, जामखेड आसे मृतदेह सापडलेल्या वृध्द इसमाचे नाव आहे. या बाबत अधिक माहिती अशी की जामखेड शहरातील अमरधाम येथील विटभट्टीच्या जवळील शेतात एका वृद्ध इसमाचा मृतदेह पडलेला होता. आज दि २४ रोजी दुपारी एक मुलगा या परीसरात आला असता त्याला सदरचा मृतदेह दिसुन आला. यानंतर ही घटना जामखेड पोलिसांना समजली व त्यांनी त्याची पहाणी केली. तसेच हा मृतदेह कोणाचा आहे याचा शोध घेण्यासाठी सोशल मिडीयावर याबाबत ची माहिती टाकली.

यानंतर संताजी नगर भागातील एक वृद्ध इसम देखील चार पाच दिवसांपासून आपल्या घरातुन बेपत्ता झाला होता. त्यामुळे नातेवाईकांनी अमरधाम परीसरातील ठिकाणी असलेल्या मृतदेहाची पहाणी केली असता



सदराच्या मृतदेहाची ओळख पटली. अंबादास रामभाऊ काळे, वय ६० वर्षे रा. संताजीनगर, जामखेड आसे मृतदेह सापडलेल्या वृध्द इसमाचे नाव आहे. मात्र संताजीनगर भागातून सदरचे वृध्द अमरधाम परीसरात कसे आले व मृत्यू नेमका कोणत्या कारणाने झाला हे अद्याप समजु शकले नसुन पोलीस त्याचा शोध घेत आहेत. याबाबत जामखेड पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# तलवाड्यात अन्न भेसळ विभाग व पोलिसांची संयुक्त कारवाई

## गोल्डन ट्रेडर्स गुटखा विक्रत्यांवर धडाकेबाज कारवाई

**प्रतिनिधी । गेवराई**

गेवराई तालुक्यातील तलवाडा गावात सर्रासपणे अवैध गुटख्याची खुलेआम विक्री होत असून हा गुटखा परिसरात मोटरसायकल व चार चाकी वाहनातून विक्री करण्यात येत होता याबाबत गुपनिय माहिती मिळताच अन्न भेसळ विभाग व तलवाडा पोलिसाची दिं.२४/४/२०२४ दुपारी तीनच्या सुमारास संयुक्त तलवाडा जुने बस स्थानक येथे असलेल्या गोल्डन ट्रेडर्स या गुटखा विक्रतेच्या दुकानावर कारवाई करण्यात आली आहे. हि कारवाई बीड येथील अन्न भेसळ विभागाचे सुरक्षा अधिकारी महिंद्रा गायकवाड, सपोनि सोमनाथ नरके,उमेश कांबळे, अन्न भेसळ विभाग,व तलवाडा पोलिसांनी संयुक्त कारवाई केली आहे. अन्नसुरक्षा अधिकारी महिंद्र बाबुराव गायकवाड यांच्या फिर्यादीवरून कलम ३०(-) अन्नसुरक्षा अधिनियम २००६ कलम ५९ अ,सु,मा,का,तसेच कलम १८८,२७२,२७३,२७८,३२८, भादवी प्रमाणे आरोपी शेख चाँद, रा ,तलवाडा यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१)सुगंधित तंबाखू (खर्रा) ३० किलो एका प्लास्टिकच्या गोणीमध्ये साठवलेले, त्याचे अंदाजे किंमत ३०० रुपये प्रति किलो प्रमाणे एकूण -९०००

२) राज निवास सुगंधित पान मसाला १० पुड़े (प्रत्येकी १९२ रु प्रती नग) एकूण किंमत १९५०/-

३) बाओबाजी पान मसाला ६ पुड़े (प्रत्येकी १९५ रु प्रती नग)एकूण किंमत ११७०/-



४) गोवा १००० पानमसाला ९ पुड़े (प्रत्येकी २०० रु प्रती नग) एकूण किंमत १८००/-

५) विमान पान मसाला केसरी युक्त ९ पुड़े (प्रत्येकी ५० रु प्रती नग) एकूण किंमत ४५०/-

६) हिरा पान मसाला २२ पुड़े (प्रत्येकी १२० रु प्रती नग) एकूण किंमत २६४०/-

७) जाफरानी जर्दा ९ पुड़े (प्रत्येकी ५० रु प्रती नग)
एकूण किंमत ४५०/-

८) रॉयल २२० तंबाखू ६ पुड़े (प्रत्येकी ६५ रु प्रती नग)एकूण किंमत ३९०/-

९) रॉयल ७१७ तंबाखू ७६ पुड़े (प्रत्येकी ३० रु प्रती नग) एकूण किंमत २२८०/- सर्व एकूण २०१३०/- रुपयांचा मुद्देमाल गुटख्याच्या जप्त करण्यात आला गोल्डन ड्रेसेस चा मालक या ठिकाणाहून फरार होण्यास यशस्वी झाला असून या प्रकरणी गुटका बंदी कायद्यानुसार तलवाडा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जिल्ह्यात अवकाळी पाऊस आणि विजेचा कडकडाट

**प्रतिनिधी । गेवराई**

बीड दिनांक २४ एप्रिल २०२४ बीड जिल्ह्यातील अनेक भागात गेल्या आठ दिवसापासून अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने जिल्ह्यात आणि ठिकाणी मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे जिल्ह्यात गेल्या आठ दिवसापासून अवकाळी पावसाने थैमान घातले असून जिल्ह्यातील परळी वैजनाथ आष्टी आंबेजोगाई गेवराई तालुक्यातील अनेक भागात वादळ वारे विजाचा कडकडे ने हे मन घातले असून गेल्या काही दिवसात जिल्ह्यातील अनेक भागात अवकाळी पावसाने आणि वीज पडून जनावरांचा मृत्यू झाला आहे तर १५ ०० हेक्टर क्षेत्रापेक्षा जास्त पिकाचे नुकसान झाले आहे



शेतातील उभे असलेले पीक फळबागा ग्रामीण भागातील घरांची पडझड झाली आहे याचा प्रभाव सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनावर पडला आहे दरम्यान जिल्ह्यातील नागरिकांनी सतर्क बाळगण्याचे आव्हान बीड जिल्हा प्रशासनाने केले असून येणाऱ्या काही दिवसात मे गर्जनीसह अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता असल्याचे सांगितले जात आहे

# कुक्कडगाव येथे जयभिम महोत्सव आणि सार्वजनिक संयुक्त जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान संपन्न

**प्रतिनिधी । कुक्कडगांव**

प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी कुक्कडगाव येथे जयभिम महोत्सव २०२४ मोठ्या ऊत्साहाने साजरा होत आहे यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे यामध्ये दि.२५एप्रिल रोजी बौध्दविहार आणि परिसरात स्वच्छता आभियान राबवण्यात आले यामध्ये लहानथोर भिमअनुयायी मोठ्या संख्येने ऊपस्थित होते.

पुढील कार्यक्रमात सायंकाळी ७ वा. शिक्षण आणि मेहनतीने विविध क्षेत्रात ठसा ऊमटवणार्या गुणवंतांचा



सहकुटूंब सत्कार करण्यात येईल. त्यानंतर संतोषजी डोंगरे यांचे स्वराज्य ते संविधान या विषयावर प्रबोधनात्मक व्याख्यान होईल,दि.२६ एप्रिल रोजी साय. ७वा युवा गायक सुमितजी साळवे यांचा बुध्दभिमगीतांचा बहारदार कार्यक्रम होईल.दि.२७एप्रिल रोजी संयुक्त जयंती मिरवणूक संपन्न होईल तरी गावातील सर्व महिला, पुरुष,लहान, थोर,सर्वच क्षेत्रातील मान्यवर, अदिंनी मोठ्या संख्येने ऊपस्थित रहावेअसे अवाहन ऊत्सव समिती आणि गवकर्यांच्या वतीने करण्यात आले आहे.



# जिल्ह्यातील जनता हेच माझे वैभव;अग्निपरीक्षेत मी तावून सुलाखून निघाले

# पाच वर्षासाठी एक संधी द्या, जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधणार

१ अधुरे स्वप्न साकार करण्यासाठी मतरुपी आशीर्वाद द्या -पंकजाताई मुंडेंचे बीडच्या जाहीर सभेत आवाहन

२ विरोधी उमेदवार बहुरंगी; जातीधर्माच्या नव्हे तर विकासाच्या मुद्यावर जिल्हा

३ सुजलाम-सुफलाम करण्यासाठी पंकजाताईंना बहुमताने विजयी करा-धनंजय मुंडे

४ बीडच्या विराट सभेत महायुतीच्या एकजुटीचे दर्शन

**प्रतिनिधी ।** बीड

नि:स्वार्थ प्रेम करणारी जनता माझ्यासोबत आहे. जिल्ह्यातील सर्व जनता हेच माझे वैभव आहे, मात्र कांही जणांची दृष्ट याला लागते. निवडणूकीत गाफील राहू नका. मी एका पराभवाला सामोरे गेले आहे. पराभवानंतर जनतेच्या साक्षीने मी समाजकारणात राहिले.अग्निपरीक्षेत मी तावून सुलाखून निघाले, त्यानंतर आता मला संधी मिळाली आहे. ही निवडणूक अवघड आहे. मी म्हणजे गोपीनाथ मुंडे असे म्हणणार नाही, कारण ज्या दिवशी मुंडे साहेबांच्या गळ्यात हार घालायचा होता, त्याचवेळी त्यांचेवर अंत्यसंस्कार करायची वेळ आली. त्यामुळे आपले त्यांचे अधुरे राहिलेले स्वप्न साकार करण्यासाठी या लोकसभेत आपल्याला विजयी व्हायचे आहे. आपल्याला एकदा दूध पोळले आहे, आता ताकही फुंकून प्यायचे, म्हणून गावागावात जा, प्रचार करा, जिल्ह्याला विकासाच्या उंचीवर घेवून जाण्यासाठी मला अधिकाधिक मताधिक्य देवून विजयी करा असे आवाहन भाजपा महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांनी आज येथे केले.

दरम्यान,जिल्ह्यात सात लाख हेक्टर जमीन जिरायत आहे, म्हणून बीड जिल्ह्यातील लोक ऊसतोडायला जातात. मनगटात ताकद पण शेतात पाणी नसल्यामुळे या जिल्ह्यातील लोक दुसर्याच्या शेतात कामाला जातात. हे चित्र बदलण्यासाठी बीड जिल्ह्याच्या विकासाच्या मुद्द्यावर ही निवडणूक करत तुमच्या विकासासाठी सक्षमपणे काम करणार्या भाजप महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडेंना प्रचंड मताधिक्क्याने निवडून द्या असे आवाहन राज्याचे कृषी मंत्री तथा पालकमंत्री पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केले. स्वत:ला शेतकरी पुत्र म्हणवून घेणार्या आपल्या विरोधी उमेदवाराने सर्वात आधी मराठा आरक्षणाचा लाभ घेत त्या आधारे केजमध्ये लोकल निवडणूक लढवली .ज्यांच्याकडे विकासाची दृष्टी नाही त्याला तुम्ही निवडून देणार का? आपल्या समोरचा उमेदवार बहुरंगी आहे अशा शब्दात त्यांनी विरोधकावर सडकून टिका केली. ही लोकसभा निवडणूक मुद्दामहून जातीवर जातेय, हे चूकीचे आहे. आमची जात काढली जात आहे. मराठा समाजाच्या आरक्षणासाठी आमचा कोणाचा कधीच विरोध नव्हता. पंकजाताई मुंडे यांनी जात-पात-धर्माच्या पलीकडे जावून जिल्ह्याच्या विकासासाठी योगदान दिले आहे. त्यामुळे जातीधर्माच्या नव्हे तर विकासाच्या मुद्यावर जिल्ह्याला सुजलाम-सुफलाम करण्यासाठी पंकजाताईंना बहुमताने विजयी करा असे आवाहन त्यांनी केले.

महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी आज आपला उमेदवारी दाखल केला. त्यानंतर पारस ग्राऊंडवर आयोजित महारॅलीचे रूपांतर विराट विजयी संकल्प सभेत झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या. पालकमंत्री धनंजय मुंडे, खा. डॉ.प्रीतमताई मुंडे, आ.प्रकाश सोळंके,आ.सुरेश धस, आ.बाळासाहेब आजबे, आ.लक्ष्मण पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आ.अमरसिंह पंडीत यांच्यासह शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, कुंडलिक खांडे, यश:श्री मुंडे, अक्षय मुंदडा, योखेश क्षीरसागर आदींसह महायुतीच्या घटकपक्षांचे नेते, जिल्हाप्रमुख उपस्थित होते. प्रास्ताविक भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले. आजची ही सभा पंकजाताई मुंडे यांच्या विजयाची नांदी आहे. पंकजाताई केवळ खासदार म्हणून निवडून येणार नाही तर केंद्रीय मंत्री होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सत्तेत असताना पंकजाताईंनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचे काम केले. त्यामुळे या निवडणूकीत जाती-पातीचे राजकारण करणार्यांना उत्तर देवून विकासाच्या मुद्यावर आपल्या सर्वांना पंकजाताईंना निवडून द्यायचे आहे असे आवाहन त्यांनी केले.

सभेच्या प्रारंभी बाळासाहेब दोडतले, कल्याण आखाडे, मनसे जिल्हाध्यक्ष सुंमत धस, प्रा.पी.टी.चव्हाण,सलीम जहाँगीर, अनिल जगताप, अनिल तुरुकमारे, विजयसिंह पंडीत, माजी आ.भीमराव धोंडे, रमेश आडसकर, आ.बाळासाहेब आजवे, आ.लक्ष्मण पवार, आ. प्रकाश सोळंके, आ.सुरेश धस, खा.डॉ. प्रितम मुंडे यांची समयोचित भाषणे झाली.

याप्रसंगी हजारोंच्या संख्येने उपस्थित जनसमुदायाला संबोधित करताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या,माझा बाप भरल्या ताटावरुन गेला, तेव्हा तुम्ही सर्व जनता सर्व माझे आधार झालात. त्यामुळेच तुम्ही मला प्रिय आहेत. माझ्यावर खूप लोकांचे स्वप्न साकारण्याची जबाबदारी होती. धनंजय मुंडेंनी आता स्पष्ट करुन टाकलयं की, जिल्ह्याचा अन् घरातला पालक म्हणून पंकजाताईंच्या विजयाची जबाबदारी घेतली हे खूप आनंददायी आहे. मी पालकमंत्री असताना विकासाच्या शक्य होईल त्या प्रत्येक योजना अनेक ठिकाणी मंजूर केल्या. शासनाकडून विकासांचा कोट्यावधी रुपयांचा निधी जिल्ह्याच्या विकासासाठी आणला. माझी नियती स्पष्ट आहे, मन कलुषित नाही, त्यामुळे मागच्या निवडणूकीत आवाहन केल्यानंतर जनतेने प्रितमताईला प्रचंड मते दिली होती. आता माझ्यासाठी मते मागत आहे, मला शेवटची संधी द्या, सर्व जाती-धर्माच्या समाज बांधवांना माझे आवाहन आहे, मला पैसे कमवायचे नाहीत की, प्रसिध्दी मिळवायची नाही तर केवळ जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करायचा आहे.

ही निवडणूक देशाची : जिल्हयाच्या विकासाची

## धनंजय मुंडे

देशाची सुत्रे पुन्हा कोणाच्या हाती सोपवायची हे ठरवणारी ही निवडणूक आहे. धनगर, माहेश्वरी, तेली, मराठा असो की वंजारी या सर्व जाती-धर्माच्या उमेदवारांना खासदार म्हणून निवडून दिले. जिल्ह्याचा पालकमंत्री अन् घरातला पालक म्हणून मला पंकजाताईला निवडून आणण्याची मोठी जबाबदारी आहे. त्यामुळे प्रितमताईंना जरी ही निवडणूक पाहून मोकळं अन् हलक-हलक वाटत असेल तितकं मला वाटत नाही. जिल्ह्यातील जनतेने इतिहासात कधीच कोणाही उमेदवाराची जात-पात-धर्म न पाहता केवळ त्या व्यक्तीची कर्तबगारी पाहून संसदेत पाठवले. आज आता तीच वेळ आली आहे. त्यामुळे पंकजाताईचे सक्षम नेतृत्व आपल्या सर्वांसमोर आहे.दुसरीकडे आपल्या समोरचा उमेदवार बहुरंगी आहे. त्यांच्या पक्षाचे राज्याचे अध्यक्ष जयंत पाटील बीडला आले, पण उमेदवारी अर्ज दाखल करायला आत आले नाहीत, कारण त्यांना माहित आहे, हा बजरंग माझ्या लहान बहिणीच्याविरोधात पराभूत झाला आहे, आता तर मोठी बहिण पंकजाताईंच्या विरोधात हे निवडणूक लढवत आहेत. मग त्यांचा निभाव लागेल का? असा प्रश्न त्यांना पडला असावा. बहुरंगीला शिवरायांसमोर शपथ घ्यावी लागली की, मी मॅनेज उमेदवार नाही. याचा अर्थ काय? असा सवाल करत धनंजय मुंडे म्हणाले बजरंग सोनवणेंनी खोटी शपथ घेतली. वास्तविक अशी शपथ घ्यायची त्यांना गरज का पडली, हा खरा प्रश्न असल्याचे ते म्हणाले. शेतकरी पुत्र म्हणून घेणार्या सोनवणेंनी मराठा आरक्षणाचा सर्वात आधी लाभ घेतला हे सांगताना पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी २०१९ चा शासन निर्णय उपस्थितांना दाखवत बजरंग सोनवणेंचे कुणबी प्रमाणपत्रही त्यांनी दाखवले. १४ जानेवारीला त्यांना कुणबी प्रमाणपत्र मिळाले. नंतर त्यांनी याच प्रमाणपत्राधारे केजच्या निवडणूकीत अर्ज भरला. असे सांगत बजरंग सोनवणे यांचा बुरखा टराटरा फाडला. हे उमेदवार कधी लोकांच्या प्रश्नासाठी रस्त्यावर आंदोलनाला बसले का? हे काय जिल्ह्यातील जनतेचे भले करणार का? असा सवाल केला. दुसरीकडे पंकजाताई मुंडे यांनी जात-पात-धर्माच्या पलीकडे जावून जिल्ह्याच्या विकासासाठी योगदान दिले. त्यामुळे जिल्हा सुजलाम-सुफलाम करण्यासाठी पंकजाताईंना प्रचंड मतांनी विजयी करा.

## रमेश आडसकरांनी गाजवले भाषण!

यावेळी भाजप नेते रमेश आडसकरांनी आपल्या भाषणात मविआचे उमेदवार बजरंग सोनवणेंवर शेलक्या शब्दात टिका केली. ‘समोरच्या उमेदवाराला माझे सांगणे आहे,वेळ गेलेली नाही, अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. कारण मी, आ.सुरेश धस यांनीही लोकसभा निवडणूक मुंडे साहेबांविरुध्द लढलो, आमचा निभाव लागला नाही. तरीही बजरंग सोनवणेंना हे का कळलं नाही’ असे सांगत जुन्या राष्ट्रवादीने मुद्दाम त्यांना उमेदवारी दिली असा उपरोधिक टोलाही रमेश आडसकरांनी लगावला. आडसकरांच्या या भाषणा उपस्थितांनी प्रचंड टाळ्या देत प्रतिसाद दिला.

## आ.बाळासाहेब आजबे

महायुती भक्कमपणे बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी आहे. पंकजाताई मुंडे या दिल्लीत जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करताना जिल्हा विकासाच्या उंचीवर नेवून ठेवतील हा विश्वास सर्वांना आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील जनतेने आरक्षणाच्या मुद्यावरुन विरोधकांकडून केला जात असलेला बुध्दीभेद ओळखावा. वास्तविक राज्य सरकारने मराठा समाजाला विधानसभेत विशेष अधिवेशन घेवून १० टक्के आरक्षण दिलेले आहे. ते आरक्षण न्यायालयातसुध्दा टिकावे यासाठी अभ्यासू अहवालही तयार केलेला आहे. म्हणून मराठा समाजानेही विरोधकांच्या चूकीच्या भूलथापांना बळी न पडता पंकजाताईंना बीड जिल्ह्याचे खासदार म्हणून विक्रमी मताधिक्य द्यावे.

## लक्ष्मण पवार

जिल्ह्यातील जनता सुज्ञ आहे. त्यांना आपला विकास कोण करु शकते, हे चांगले माहित आहे. त्यामुळे पंकजाताईंना प्रचंड मताधिक्क्याने निवडून देण्यासाठी महायुतीतील सर्व घटक पक्षाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मेहनत घेवून येत्या १३ तारखेला पंकजाताईंना विजयी करत दिल्लीत संसदेत बीड जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करायला पाठवावे असे आवाहन गेवराई मतदार संघाचे आ.लक्ष्मण पवार यांनी केले.

## आ.प्रकाश सोळंके

जिल्हा विकसित करण्यासाठी, तरुणांच्या हाताला रोजगार देण्यासाठी आपल्या महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना सर्व जिल्ह्यातील मतदारांनी मतदान करुन विजयी करावे. आपण इतके दिवस एकमेकांच्या विरोधात निवडणूका लढवल्या, मात्र आता आपली महायुती झाली आहे. त्यामुळे ही निवडणूक एकतर्फी जिंकून देत पंकजाताईंच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहा. भविष्यातील काही मिळायचे असेल तर ते महायुतीतूनच मिळेल त्यामुळे आपल्या राजकीय महत्वाकांक्षेला आवर घाला. संपूर्ण देशातून पंकजाताई मुंडे सर्वाधिक मताधिक्क्याने निवडून येतील. बीड जिल्ह्यात, ब्राह्मण, वाणी,तेली समाजाचे उमेदवार खासदार म्हणून निवडून आलेले आहेत. म्हणजेच जिल्ह्यात अजूनही जातीपातीच्या राजकारणाला थारा मिळालेला नाही हे लक्षात घेवून जनतेने मतदान करावे असे आवाहन आ.प्रकाश सोळंके यांनी केले.

## आ.सुरेश धस

आ.प्रकादादा आता पुढचा काहीच विचार करायचा नाही. यापुढे आता या महायुतीतील कोण कोणत्या चिन्हावर लढेल हे काहीच आता सांगता येत नाही. इतकी सारी राजकीय स्थिती बदललेली आहे असे सांगत आ.सुरेश धस यांनी उपस्थितांमध्ये चांगलाच हशा पिकवला. उद्या जे व्हायचं ते होईल पण आता मात्र आपल्या सर्वांना पंकजाताईंना एकदिलाने निवडून आणायचे आहे. अब की बार चारसो पार असे भाजपने सांगितल्यानंतर काँग्रेस व त्यांच्या मित्रपक्षाने अबकी बार पाचसो पार असे म्हणावं, मात्र त्यांची अवस्था केविलवाणी झालेली आहे, मात्र आम्ही चारसो पार म्हटलं की, विरोधक मुस्लिम समाजात सीएएवरुन चूकीचे गैरसमज पसरवतात. संविधान बदलणार म्हणून आमच्या विरोधात चूकीचे वक्तव्य ते करतात. मात्र घटना कोणीच बदलू शकत नाही. आमच्या विरोधकांना जनता चांगले ओळखते. वास्तविक प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातील सर्व घटकांचा विकास केला. गरिबांना न्याय दिला आहे हे सांगताना आ.धस यांनी महाविकास आघाडी सरकारने अभिनेत्री कंगणा राणावत, केंद्रिय मंत्री नारायण राणे, टीव्ही पत्रकारांचा सत्तेचा गैरवापर करुन केलेला छळ उपस्थितांसमोर मांडला. दोन हॉर्वेस्टरचे मालक शेतकरी पुत्र कसे? असा सवाल करत त्यांनी बजरंग सोनवणेंवर टिका केली. भाजप सरकारमध्ये मंत्री असताना पंकजाताईंनी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून केलेली रस्त्यांची कामे, तांड्यापर्यंत दिलेल्या सुविधा, महिला व मुलींच्या कल्याणाच्या राबवलेल्या योजना अन् मुलींचा जन्मदर वाढवण्यासाठी राबवलेल्या योजनांचा आढावा घेत विकासाभिमुख नेतृत्व असलेल्या पंकजाताई मुंडे यांना प्रचंड मतांनी विजयी करुन संसदेत पाठवण्याचे आवाहन केले.

## खा.डॉ.प्रितमताई मुंडे

ही आजची सभा खर्या अर्थाने विजयाची सभा आहे. पंकजाताईंनी पालकमंत्री असताना जिल्ह्यासाठी किती विकास कामे केली हे मी सांगणे म्हणजे सूर्याला दिवा दाखवण्यासारखे आहे. मला सांगा, भारत देश जगात तिसरी महासत्ता होतोय, यासाठी नव्हे तर आमच्या लाडक्या पंकजाताईंना त्यांच्या योग्यतेच्या पदावर पुन्हा बसवण्यासाठी तुम्हाला ही निवडणूक महत्वाची वाटते हे मला चांगले माहित आहे. मला माहिती आहे, संपूर्ण राज्यभरातून आज लोकं इथे आले आहेत, त्यामुळे ही खर्या अर्थाने विजयाची सभा मी मानते. पंकजाताईंना तुम्हा सर्वांचे मतरुपी आशिर्वाद द्या, अन् माझ्यापेक्षा जास्त विक्रमी मताधिक्याने निवडून द्या. तुमच्यापैकी कोणालाही पंकजाताईंकडे कामे घेवून जाताना फार विनंत्या कराव्या लागल्या नाही. पंकजाताईंनी बोलावून घेत गाव विकासासाठी निधी दिला. त्यामुळे ताईंनी जे विकासाचे योगदान दिले त्याची परतफेड करण्यासाठी आपण कोणीही कमी पडू नये. हे तेच मैदान आहे जिथे २०१९ मध्ये मी भाषण केले होते. मात्र मी कोणावरही टिका करत नाही. २०१९ ला साहेबांच्या बारकीला तुम्ही विजयी केले. आता या निवडणूकीत तुम्ही साहेबांच्या मोठीला मोठ्या मताधिक्याने विजयी करा. दिग्गज नेते आपल्या सोबत आहेत. त्यामुळे प्रत्येक विधानसभा मतदार संघातून २० हजारांची जरी वाढीव मताधिक्य दिले तर आपल्या पंकजाताई ५ लाखांच्या मताधिक्क्याने सहज विजयी होतील असा विश्वासही खा.प्रितमताई मुंडे यांनी व्यक्त केला.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT